# झरि लागै महलिया गगन घहराय

गुरुमाई चिद्विलासानंद यांनी संतकवी धर्मदास यांच्याद्वारे लिखित या भजनाची संगीतरचना राग मेघ मल्हारमध्ये केली. हा राग पावसाचे आवाहन करतो. श्रीगुरुमाईंनी गायलेल्या या भजनाचे श्रवण करा आणि असे मानसचित्रण करा की, ऑस्ट्रेलियावर वर्षारूपी आशीर्वाद बरसत आहेत.

ध्रुवपद

माझा हृदयरूपी महाल एका विस्तीर्ण अंतराकाशाच्या मध्ये स्थित आहे,
जिथे काळे मेघ दाटून आले आहेत.

पद १

ढगांचा गडगडाट आणि वीजेची चमक यांनी अंतराकाश प्रत्येक क्षणी भरून जाते आहे.

आनंदाच्या लाटा, एकामागून एक उसळतच आहेत : याची शोभा अवर्णनीय आहे!

पद २

अंतराकाशातील परम मौनातून अमृतवर्षा होते आहे,

आणि साधक प्रेमानंदात न्हाऊन निघतो आहे.

पद ३

कवाडे पूर्णपणे उघडली आहेत. अंधकार नष्ट झाला आहे.

धन्य आहेत माझे सद्गुरू ज्यांनी हे अद्भुत दृश्य माझ्यासमक्ष प्रकट केले आहे.

पद ४

धर्मदास हात जोडून ही विनंती करतात :

मी सदैव माझ्या सद्गुरूंच्या चरणकमलांमध्ये लीन होऊन राहावे.

© २०२० एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.